JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# खिवारी : ठाकर समाजाची सांकेतिक भाषा

**प्रकाश नंदकिशोर मालंडकर**
(संशोधक विद्यार्थी)
मराठी विभाग, फैकल्टी ऑफ आर्टस्
महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा
वडोदरा, गुजरात - ३९०००२

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यामध्ये पिंगुळी नांवाचे गांव आहे. या गांवात ठाकर जमातीचे लोक राहतात याच ठाकर जमातीने 'चित्र कथी' हा लोककला प्रकार जतन करुन ठेवला आहे. 'चित्र कथी', 'कळसुत्री बाहुल्या माणि "छाया बाहुल्या' हे महाराष्ट्रात सद्या अस्तित्वात असलेले लोकखेळ 'पिंगुळी परंपरेतील लोककला' म्हणून ओळखले जातात. कारण महाराष्ट्रात सद्या पिंगुळी याच गांवी ह्या कला एकत्रितपणे पहायला मिळतात. आणि त्यांना सुमारे ३०० वर्षांची परंपरा आहे.[१] सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील पिंगुळी ह्या गावच्या ठाकर जमातीने या लोककला जतन करुन ठेवल्या आहेत. सद्या महाराष्ट्रात त्या इतरत्र आढळत नसल्याने व वरील सांगितल्याप्रमाणे त्याला एक परंपरा असल्याने ‘पिंगुळी परंपरेतील लोककला' म्हणून त्या ओळखल्या जातात. यातील विशेष नमुद करण्यासारखी बाब म्हणजे चित्रकथीसाठी लागणारी चित्रे असतात. ती चित्रे काढण्याची, रंगवण्याची एक विशिष्ठ शैली आहे. तर या 'चित्र कथी’तील चित्रकला शैलीला ‘पिंगुळी कलम’ असे नामाभिधान प्राप्त झाले आहे. [२]

पिंगुळी (तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदूर्ग) येथे आढळणा-या चित्रकथी, कळसुत्र, छाया बाहुल्या, तमाशा (राधा), पांगुळ, पोवाडा, गीता (लोकगीते) या नऊ लोककलांना ‘पिंगुळी’ परंपरेतील लोककला असे संबोधले जाते. [३]

यापैकी चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या व छाया बाहुल्या हे तीन प्रमुख लोककला प्रकार आहेत. हे तीन प्रमुख लोककला प्रकार केवळ पिंगुळी येथेच सादर केले जातात.

चित्रांच्या साहाय्याने कथन केलेली गोष्ट म्हणजे 'चित्रकथी. अशी चित्रकथीची साधी व्याख्या करता येईल. तथापि ही एक स्वतंत्र लोककला परंपरा असल्याने याच्या कक्षा रुंदावतात. चित्रकथीतून रामायणाच्या कथा मुख्यत्वे करुन सांगितल्या जातात. संत एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा’चा प्रभाव चित्रकथीवर आहे. त्याचप्रमाणे प्रसंगानुरूप प्रबोधनाच्या हेतूने काही कथा यात समाविष्ठ केल्या गेल्या आहेत. ठाकर जमातीतील लोक या रामायणाला ‘ठाकरी रामायण’ असे म्हणतात.

'कळसुत्री बाहुल्या' या खेळाचे स्वरूप चित्रकथीशी मिळते जुळते आहे. आणि थोडे भिन्न देखिल आहे. या लोककलेचे स्वरूप प्राचीन आहे. ज्ञानेश्वरी मध्ये ‘साईखडे’ ह्या नांवाने कळसुत्री बाहुल्यांचा उल्लेख केलेला आढळतो. पिंगुळीच्या परंपरेतील कळसुत्री बाहुल्यांच्या खेळाचे एक महत्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे यातील बाहुल्या तीन दोराच्या असतात.

छाया बाहुल्यांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की हे खेळ नक्की केव्हा सुरू झाले याविषयी संशोधकांत मतभेद आहेत. मात्र ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात

"ॐ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।

भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।"

या गीतेच्या श्लोकावर टीका लिहिताना ज्ञानेश्वरांनी असे म्हटले आहे की, '

**स्वमायेचे आडवस्त्र** | **लेवूनि एकला खेळवी सुत्रं** I
**बाहेरी नटी छायाचित्र** | **चौ-यांशी लक्ष ॥**

**१३०३ ॥ १८ ॥ ज्ञानेश्वरी ॥**

याचा अर्थ असा की, जो आपल्या मायेचा आडपडदा लावून आतून एकटाच सुत्र हलवून  बाहेर चौ-याऐंशी लक्ष छायारूपी चित्रे नाचवितो. यावरुनच त्या काळात छाया नाटके लोकांना परिचित होती असे दिसते. [४]

ठाकर जमातीला शिवशाहीच्या काळात राजाश्रय मिळाला. अनेक मराठा सरदार आणि राजांनी या कलावंतांना प्रोत्साहन दिले. चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या आणि छाया बाहुल्या या पिंगुळी परंपरेतील लोककला तत्कालीन सावंतवाडी संस्थानांच्या आश्रयामुळे भरभराटीला आल्या. सावंतवाडीच्या राजवाड्यात दरवर्षी गणेश चतुर्थीला 'चित्रकथी' चा खेळ होत असे.[५] कुडाळ मधील केळबाई देवीच्या मंदीरात नवरात्रीचे नऊ दिवस ठाकर जमात देवीचे जागरण करतात.

प्रस्तुत शोध निबंधात आपण खिवारी या ठाकर जमातीच्या सांकेतिक भाषेची माहिती घेणार आहोत. सदर भाषेला ठाकर समाज ‘पोटभाषा’ असे देखिल म्हणतो. ‘पिंगुळी परंपरेतील लोककला’ जिवंत ठेवण्यासाठी आयुष्यभर कार्यरत असलेले ज्येष्ठ लोक कलावंत 'पद्मश्री परशुराम गंगावणे’ यांची मुलाखत घेतल्यावर लक्षात आले की, ही भाषा सांकेतिक भाषा नसून ठाकर जमातीची मुळ बोली भाषा होती. सदर भाषा ठाकर जमातीतील लोकं घरात किंवा आपल्या जमातीतील लोकांशी संवाद साधण्यासाठी वापरत असत. खरं पाहता खिवारी ही सांकेतिक भाषा म्हणून आपण आता अभ्यासत असलो तरी ही ठाकर जमातीची मुळ भाषा होती. कालपरत्वे त्या भाषेचा वापर मर्यादित होवून सद्या काही वाक्ये व शब्द संग्रहा पुरती ती उरली आहे.

शिवशाहीच्या काळात ठाकर कलावंत आणि त्यांच्या कलेला राजाश्रय मिळाला. ठाकर समाज जंगलातून ग्रामीण वस्तीत आला. त्यामुळे केवळ घरगुती वापरासाठी खिवारी भाषेचा वापर केला जाऊ लागला व दैनंदिन व्यवहारासाठी मालवणी, मराठी बोली भाषांचा वापर होवू लागला. परिणामी खिवारी ही भाषा मर्यादित राहिली. सदर भाषा केवळ ठाकर

लोकांना ज्ञात असल्याने याचा वापर शिवशाहीच्या काळात हेरगिरीसाठी किंवा महत्वाची माहिती शत्रूला न कळता पोहोचवण्यासाठी केला जाई. भटके कलावंत समजून शत्रूचेही यांच्याकडे दुर्लक्ष होई. तसेच चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या इत्यादी प्रयोगांमार्फत समाज प्रबोधन देखिल केले जात असे.

'कोकण कला अकादमी' आयोजित 'ठाकर लोककला महोत्सवा' मध्ये 'दायती' नामक लोककला विशेषांक प्रकाशित करण्यात आला. सदर महोत्सव मे 1997 मध्ये झाला होता. या विशेषांकात मोहन रणसिंग यांनी ठाकरी बोली आणि ठाकरी सांकेतिक भाषा 'खिवारी' या विषयी माहिती दिली आहे. ६

''सांकेतिक भाषा ही उदाहरणाशिवाय पटवून देता येत नाही. म्हणून ठाकरी सांकेतिक बोलीच्या पुढे मराठी अर्थ कंसात देत आहोत. 'पनया ठाल, चोलू नटे' (पोरा थांब, बोलू नकोस) 'टोमा घासकला, नाटान खुकान' (मोठा माणूस आला, तू घरात जा.) कन्शीन मनेळी ठडिकतेय' (पत्नी पेज खातेय) अशा प्रकारे ही भाषा असते. हया सांकेतिक बोलीचा शब्द संग्रह पुढीलप्रमाणे आहे.

| पदार्थः- | |
|---|---|
| रेवाटी - सागोती | मनेळी - पेज |
| तिकमी - मिरची | फुलग्या - भात |
| केनगा - दूध | निक-या - सांबारा |
| भामुरका - वडा | कुमी - दारु |
| चिवानी - पाणी | |

| नातेसंबंधः- | |
|---|---|
| बांडगा - मुलगा (स्वतःचा) | पनवा - मुलगा |
| बांडगी - मुलगी (स्वतःची) | पनयी - मुलगी |
| कन्शीन - पत्नी | खेजगी - आई |
| खेजगा - बाप | भाउरक - भाऊ |
| विशेषणेः- | |
| खेतारा - म्हातारा | खेतारी - म्हातारी |
| गिराम - चांगला | गईम - चोर |
| टोमा - मोठा | लिचडा - लहान |
| बांगा - वेडा | बांगी – वेडी |

| प्राणीः- | | |
|---|---|---|
| मेकळी - मासे | झुकला - कुत्रा | सोमाडा - बैल |
| भुकाळा - डुक्कर | पकला - कोंबडा | |

| क्रियापदेः- | | |
|---|---|---|
| वडिकणे - खाणे | खुकानणे - जाणे | ठुकळणे - झोपणे |

| | | |
|---|---|---|
| खपळणे - धावणे | लोबणे - मागणे | चोलणे - बोलणे |
| शिंगावणे - सांगणे | खावरणे - घेणे | धासकण - येणे |
| खोमडणे - मोडणे | लुगवणे - मारणे | |
| बोकावणे - तुटणे | पाकवणे - मारणे | |

इतर शब्दः-

| | | |
|---|---|---|
| नाट - घर | खापा - रुपया | खामन - बामन |
| खयला - कुडवाडी | कुगाड - महार | खिवारी - भिकारी |
| गौदा - हात | टिकावं - पैसे | खोमाड - तोंड |
| गिरामन - ब्राह्मण | डोंबार - पोट | फळगा - नारळ |
| कवर - कुडवाडी | खीव - भिक | लिशाडा - लग्न |
| चमलीक - चांभार | | |

सदर भाषेची माहिती घेण्यासाठी चेतन गंगावणे यांची मुलाखत घेतली. त्यावेळी त्यांनी माहिती दिली की सद्यस्थितीमध्ये पिंगुळी गांवातील ठाकर समाजात 'खिवारी' ही परिपुर्ण भाषा मिळणे अवघड आहे. परंतु त्यांन दिलेल्या माहितीप्रमाणे त्यांच्या पिंगुळी येथील संग्रहालयाला भेट द्यायला आलेल्या काही लोकांना खिवारी भाषेचे पुर्ण ज्ञान होते. परंतु त्या लोकांविषयी माहिती अद्याप अज्ञात आहे. खिवारी भाषेचा शोध घेवून तिच्या मुळ रुपात तिचे संवर्धन गरजेचे आहे. तसेच खिवारी भाषा हा संशोधनाचा विषय असून यात संशोधन होणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ :-


१) Gangavane Vasant, Preface, Manograph, Kalsutra of Maharashtra P.2 (Not Published Available with this student)

२) कॅप्टन शिंदे मा.कृ., मराठी रंगभूमी : उगम आणि विकास आ. १, मुंबई, श्रीरंग प्रकाशन, १९७८ पृ. ३२

३) डॉ.केळूसकर महेश, चित्रकथी, आ.१, ठाणे, अनघा प्रकाशन, 2019, पृ. ७

४) डॉ. केळूसकर महेश, चित्रकथी, आ.१, ठाणे, अनघा प्रकाशन, 2019 पृ.४५

५) Sadwellkar Baburao, 'Chitra kathi Tradition of Pinguli And the Environment' (Note on calender published by the Director of Art, Maharashtra State) P.2

६) 'दायती' - ठाकर लोककला विशेषांक, मे 1997 मुंबई संपादन - नारायण वाक्कर, पृ.१५-१६